**''प्रेसनोट''** दिनांक २३/१०/२०२४

## '' वडिलांचा मित्र बोलतोय! असा बहाणा करून फसवणुक करणाऱ्या गुन्हेगारास जेरबंद केलेबाबत.''

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस ठाणे | : | डॉ. डि.बी. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई. |
| ०२ | गु. र. क्र. / कलम | : | २१४/२०२४, कलम ४१९, ४२० भांदवि सह कलम ६६ (क),६६(ड) आय.टी ॲक्ट २००० |
| ०३ | गु. घ. दिं. व वेळ | : | दिनांक ०५/०४/२०२४ रोजी सकाळी १२.३९ वा ते १२.४३ दरम्यान |
| ०४ | गु. दा. दि. व वेळ | : | दिनांक १०/०४/२०२४ रोजी २१:०२ वाजता. |
| ०५ | आरोपीचा तपशील | : | एक २३ वर्षे वयाचा इसम. |
| ०६ | अटक आरोपींची संख्या | : | ०१. |

डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाणेच्या हद्दीत राहणाऱ्या तक्रारदाराने तक्रार दिली की, दिनांक ०५/०४/२०२४ रोजी दुपारी १२.३९ वा सुमारास त्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर एक अनोळखी मोबाईल क्रमांक ६३७०९८२७३२ धारक इसमाने त्यांच्या वडीलांचे पैसे दयायचे असल्याचे खोटे सांगून, त्याने त्यांच्या खात्यावर ज्यादा पैसे पाठविले असल्याचे टेक्स मेसेज पाठवून, फिर्यादींना गुगल पे क्रमांक ८१०२२१३४५४ यावर ४५,०००/— रुपये पाठविण्यास भाग पाडून फिर्यादीची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली. म्हणुन सदरबाबत फिर्यादीचा सविस्तर जबाब घेवून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

यातील आरोपीत इसम हा त्याचे अस्तित्व लपवुन राहत होता. सदर गुन्हा दाखल झाल्यापासुन सतत यातील आरोपीताच्या ठावठिकाण्याचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तपास करण्यात येत होता. सदर आरोपीताचा तांत्रिक पद्धतीने शोध घेतला असता, सदर आरोपीत हा औरंगाबाद, बिहार येथे वावरत असल्याचे दिसून येत होते.

दिनांक १५/१०/२०२४ रोजी, पोलीस ठाणे पातळीवर एक टीम तयार करण्यात येवून सदर टीमला तात्काळ वरिष्ठांच्या परवानगीने औरंगाबाद, बिहार येथे रवाना करण्यात आले. सदरबाबत तांत्रिक व स्थानिकांच्या मदतीने कार्यवाही करण्यात आली. त्यास स्थानिक बारून पोलीस ठाणे, बारून, औरंगाबाद, बिहार यांच्या मदतीने मंगरहीया परिसरात सापळा लावून शिताफिने ताब्यात घेतले. आरोपीताने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात येवून त्यास ट्रान्झिट रिमांड सह व्यवहार न्यायालय, औरंगाबाद, बिहार येथे हजर करण्यात आले. सदर आरोपीतास मा. गिरगांव न्यायालयात हजर केले असता त्यास दिनांक २५/१०/२०२४ पावेतो पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. डॉ. श्री. अभिनव देशमुख, अप्पर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. डॉ. श्री. मोहीतकुमार गर्ग, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ०२ यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.आ. ज्ञानेश्वर वाघ, व.पो.नि. श्री. संजय गायकवाड, पो.नि. श्री. प्रशांत पाटील, स.पो.नि. श्री. तुकाराम डिगे, पो.उप.निरी. श्री. अविनाश आरडक, श्री. वैभव गुरव, पोलीस हवालदार आंनद गावडे, पोलीस शिपाई सूरज धायगुडे, चैत्राम पावरा, संतोष केदारी यांनी पार पाडली.

Scanned with CamScanner